# शितयुद्धोत्तर भारत आणि शेजारी देश

**प्रा.ए.बी. मोहिते** म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर
**प्रा.यु.एन.लाड** श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज माळवाडी–कोतोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

..............................................................................................................................

**गोषवारा**

कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट राष्ट्रहित हे असते. देशांतर्गत परिस्थिती, आंतरराष्ट्रीय परिस्थिती तसेच देशाच्या विविध गरजांना अनुसरून परराष्ट्र धोरणाची दिशा निश्चित केली जाते. शीतयुद्धोत्तर काळात भारतात केंद्रामध्ये सत्तेत आलेल्या विविध सरकारच्या कार्यकाळातील भारताच्या शेजारील देशांविषयी असलेली भूमिका आणि त्या अनुषंगाने या देशांशी स्थापित केलेल्या परराष्ट्र संबंधांची चर्चा प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आली आहे.

**प्रास्ताविक**

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. जगातील तणाव व संघर्ष कमी होईल असे वाटत होते; परंतु जगातील अनेक भागामध्ये विविध समस्या निर्माण झाल्या. त्यामध्ये दहशतवाद, वांशिक संघर्ष, निर्वासित, पर्यावरण, सत्ताधाऱ्यांविरोधी जनतेचा उठाव इ. अनेक समस्या निर्माण झाल्या. याचा परिणाम भारतावर व भारताच्या शेजारी देशांवरही झाला. परिणामी भारताला आपल्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार करावा लागला.

याच कालखंडात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला अधिक वेग आला. विभागीय पातळीवर अनेक व्यापारी संघ उदयास आले. अनेक देशांनी आपल्या अर्थव्यवस्था खुल्या केल्याने परस्पर आर्थिक सहकार्य वाढीस लागले. अनेक राष्ट्रांनी विचारासरणी आणि राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक व व्यापारी हितसंबंधांच्या रक्षणाला प्राधान्य दिले. सोव्हिएट रशियाचे, युगोस्लाव्हिया व चेकोस्लोव्हाकीयाचे विघटन झाले. जर्मनीचे एकत्रीकरण झाले. पूर्व युरोपातील अनेक देशांनी लोकशाही व्यवस्था स्वीकारली. या काळात अशासकीय संस्था व संघटनांचा प्रभाव वाढलेला दिसून येतो. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलते प्रवाह लक्षात घेऊन भारताला आपल्या परराष्ट्र धोरणाचा नव्याने विचार करावा लागला आहे.

**पी.व्ही.नरसिंहराव सरकारचे परराष्ट्र धोरण (१९९१ ते १९९६)**

भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या बदलांची सुरुवात नरसिंहराव यांच्या काळात झाली. त्यांनी भारताची अर्थव्यवस्था खुली करण्यास प्रारंभ केला. तसेच परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे निश्चित करून त्यानुसार भारताच्या परराष्ट्र धोरणात राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हितसंबंधांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. विचारसरणी व आदर्शवादाऐवजी वास्तववादावर भर देण्यात आला. एकध्रुवी जगामध्ये अमेरिकेबरोबर संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला.

**लुक ईस्ट पॉलीसी**

यापुर्वी भारत आपल्या आर्थिक, व्यापारी, संरक्षण व राजकीय हितसंबंधांसाठी पाश्चिमात्य राष्ट्रांबरोबर व्यवहार करत होता. नरसिंहरावांनी 'लुक ईस्ट' पॉलीसीच्या माध्यमातून आतापर्यंत दुर्लक्षित असलेल्या पूर्व आशियायी राष्ट्रांकडे लक्ष कळविले. ही राष्ट्रे भारताच्या व्यापारी हितसंबंधांसाठी उपयुक्त ठरू शकतात. याची जाणीव सरकारला झाली. या राष्ट्रांचा 'आसियान' हा एक प्रभावी व्यापार संघ या क्षेत्रात कार्यरत आहे.

**इंद्रकुमार गुजराल सरकारचे परराष्ट्र धोरण (१९९७–१९९८)**

इंद्रकुमार गुजराल यांना प्रधानमंत्रीपदाचा फारच कमी कालावधी मिळाला. तरीही त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक नवी दिशा देण्याचे कार्य केले. त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सैद्धांतिकीकरण केले. तसेच शेजारी राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्यावर भर दिला. त्यांनी परराष्ट्र धोरणासंदर्भात दोन प्रकारची तत्त्वे विकसित केली.

**१) केंद्रबाह्य वर्तुळ सिद्धांत**

हे तत्त्व प्रामुख्याने भारत–पाकिस्तान संबंधासंद ति आखण्यात आले आहे. या दोन देशांमध्ये काश्मिर हा गाभ्याचा प्रश्न आहे. या प्रश्नावरून दोन्ही देशात नेहमीच तणाव निर्माण झालेला असतो. तसेच १९९० नंतर काश्मिरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी कारवाया मोठ्या प्रमाणता सुरू होत्या. त्यामुळे तणावाचे कारण असलेला गाभ्याचा काश्मिर प्रश्न तात्पुरता बाजुला ठेवून बाह्य वर्तुळातील विषयांबाबत सहकार्य करण्याचे धोरण ठरविण्यात आले. यामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यापार क्षेत्रात सहकार्य केल्याने विश्वास निर्मिती होऊन गाभ्याचा काश्मिर प्रश्न सुटण्यास मदत होईल, अशी धोरण आखणी करण्यात आली.

२) तरंग सिद्धांत

तरंग सिद्धांत तत्त्वानुसार भारताच्या परराष्ट्र धोरणाची आभासी तरंग वर्तुळे तयार करण्यात आली आहेत. यामध्ये पहिल्या वर्तुळात दक्षिण आशियाचा समावेश केला आहे. त्यानुसार प्रथम दक्षिण आशियातील देशांशी संबंध विकसित करण्याचे धोरण अवलंबले. दुसऱ्या वर्तुळात त्यांनी हिंदी महासागर क्षेत्रातील राष्ट्रांचा समावेश केला आहे. त्याला 'इंडियान ओशन रिम' असे नाव दिले आहे. तिसऱ्या वर्तुळात पूर्व आशियातील राष्ट्रांचा समावेश केला असून आसियान बरोबर व्यापारी संबंध दृढ करण्याचा प्रयत्न

केला आहे. चौथ्या वर्तुळात ओपेक व इस्लामी राष्ट्रसंघटनेचा समावेश केला आहे. पाचव्या वर्तुळात युरोपियन युनियनचा समावेश केला आहे. वरीलप्रमाणे गुजराल यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुत्रबद्ध मांडणी केली आहे.

**अटलबिहारी वाजपेयी (एन.डी.ए.) सरकारचे परराष्ट्र धोरण (१९९८ ते २००४)**

अटबिहारी वाजपेयी यांच्या काळात परराष्ट्रधोरण वास्तववादी बनवण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या काळात १९९८ मध्ये ारताचे अण्वस्त्रांच्या चाचण्या घेतल्या आणि स्वत:ला जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. त्यांनी अमेरिकेशी जवळीक साधून भारत–अमेरिका यांच्यात सामरिक सहकार्य विकसित करण्याचा प्रयत्न केला. वाजपेयींनी पी–५ ही संकल्पना मांडून युनोच्या सुरक्षापरिषदेच्या पाच कायम सदस्यांबरोबर संबंध विकसित करण्याचा प्रयत्न केला. १९९९ मध्ये कारगील युद्ध भारत व पाकमध्ये झाले. यामध्ये पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. वाजपेयी यांनी इतर शेजारी देशांबरोबर संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले.

**यु.पी.ए. एक व दोन सरकारचे परराष्ट्र धोरण (२००४ ते २०१४)**

डॉ.मनमोहनसिंग यांच्या नेतृत्त्वाखाली यु.पी.ए. सरकार सत्तेवर आले. या काळात अमेरिकेबरोबर नागरी अनुकरार करण्यात आले. चीन व पाकिस्तातनसोबत करार केले. भारत–चीन सीमाप्रश्न सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांविषयी परस्पर संमत्तीच्या करारावर सह्या करण्यात आल्या. काश्मिर प्रश्न सोडविण्यासाठी डॉ.मनमोहनसिंह प्रयत्न करत होते; परंतु २००८ मधील मुंबई दहशतवादी हल्ल्याचे उगमस्थान पाकिस्तान असल्याने दोन्ही देशातील संबंधामध्ये तणाव निर्माण झाला.

**परराष्ट्र धोरणाची पीछेहाट**

युपीए – २ सरकारच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात नकारात्मक प्रवाह दिसू लागले. या काळात युपीए सरकारमधील प्रादेशिक पक्षांचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर पडू लागला. उदा. तामिळनाडूतील डी.एम.के. या पक्षाने केंद्र शासनावर दबाव आणून मानवाधिकारांच्या मुद्द्यावर श्रीलंकेच्या विरोधात भूमिका घेण्यास भाग पाडले. २०१२ मध्ये श्रीलंकेतील राष्ट्रकुल परिषदेला भारताचे प्रधानमंत्री डी.एम.के. च्या दबावामुळे अनुपस्थित राहिले. याबरोबरच बांग्लादेशाबरोबर सीमा करार आणि तिस्ता नदी पाणी वाटप करार झाला; परंतु युपीए मधील घटकपक्ष असलेल्या तृणमुल काँग्रेसने तिस्ता पाणीवाटप करार हाणून पाडला. थोडक्यात भारताचे परराष्ट्र धोरण संकुचित प्रादेशिक पक्षांच्या हितसंबंधांसाठी काम करू लागले. भारताचे शेजारील राष्ट्रांबरोबरचे संबंध तणावपूर्ण बनले. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या प्रतिमेला तडा गेला. एक कमकुवत देश अशी भारताची प्रतिमा तयार झाली. २००९ नंतर भारताने पाकिस्तानला अटी घालायला सुरुवात केली. अमेरिकेबरोबरही भारताचे संबंध तणावपूर्ण बनले. याबरोबरच नेपाळ, भूतान, म्यानमार, बांग्लादेश, श्रीलंका या शेजारी राष्ट्रांकडे दुर्लक्ष झाले, याचा फायदा चीनने घेतला आणि भारताच्या शेजारी राष्ट्रांवर आपला प्रभाव वाढवला. तसेच या राष्ट्रांच्या माध्यमातून भारताला घेरण्यास सुरुवात केली.

**मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण (२०१४ पासून)**

मे २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आले. या सरकारने 'शेजारी प्रथम' हे धोरण राबविले आहे. शेजारील देशांच्यावर लक्ष केंद्रीत करून त्यांच्याशी संबंध सुधारण्यावर भर दिला आहे. मोदींनी दक्षिण आशियातील शेजारी राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांना शपथविधी सोहळ्याला आमंत्रित केले होते. दुसऱ्या दिवशी प्रत्येक देशाच्या प्रमुखांशी त्यांनी व्यक्तिगत चर्चा करून शेजारी देशांबरोबर संबंध अधिक दृढ करण्यास आपले सरकार प्राधान्य देणार असल्याचे सूचित केले आहे.

**आर्थिक विकास आणि सुरक्षेचे उद्दिष्ट**

मोदी यांनी निवडणूक प्रचारात दखिझ आशियातील आर्थिक विकास व गरिबी हे दोन प्रश्न उचलून धरले होते. कारण ारताचा आर्थिक विकास आणि अंतर्गत सुरक्षा ही शेजारील राष्ट्रांमधील शांतता, राजकीय स्थैर्य, लोकशाही व त्यांच्या आर्थिक विकासाशी निगडीत आहे. कारण भारताच्या सीमा या राष्ट्रांना जोडलेल्या आहेत. त्यामुळे या राष्ट्रांच्या आर्थिक विकासामध्ये योगदान देणे हे भारताने प्रमुख उद्दिष्ट ठरविले आहे. त्याची सुरुवात मोदींनी प्रथम भूतान आणि आणि नेपाळला भेट देऊन केली. परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी बांग्लादेश, म्यानमार, सिंगापूरला भेट दिली. जागतिक स्तरावर जबाबदारीने कार्य करण्यासाठी भारताला स्थिर आणि शांततामय शेजारी देशांचा पाठिंबा मिळविण्यासाठी मोदी प्रयत्नशील आहेत.

उरी येथील दहशतवादी हल्ल्यानंतर २९ सप्टेंबर २०१६ रोजी भारताने पाक व्याप्त काश्मिरमध्ये सर्जिकल स्ट्राईक्स केल्याची घोषणा केली. यामुळे भारत–पाकमध्ये तणाव निर्माण झाला आहे. राजनयिक स्तरावर पाकला वेगळे पाडण्याचा भारताचा प्रयत्न आहे. सार्कच्या इस्लामाबादमधील शिखर परिषदेवर भारताने बहिष्कार टाकला. भारताला इतर देशांनी साथ दिल्याने पाकला परिषद पुढे ढकलावी लागली. त्यामुळे पाकबाबत शेजारी प्रथम या धोरणाऐवजी वेगळे धोरण स्वीकारावे लागणार आहे. त्याअनुषंगाने स्वातंत्र्यदिनाच्या भाषणामध्ये मोदी यांनी बलुचीस्थानमधील मानवाधिकारांचा मुद्दा उपस्थित केला आहे.

**विस्तारीत शेजारी प्रथम धोरण**

मोदींनी आपल्या शपथविधी सोहळ्याला दक्षिण आशियातील राष्ट्र प्रमुखांनी निमंत्रण दिले होते. त्याचबरोबर हिंदी महासागर क्षेत्रातील मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम यांनाही निमंत्रित केले होते. म्हणजेच शेजारी प्रथम हे धोरण दक्षिण आशिया पलिकडे जाणारे आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या २०१५–१६ च्या वार्षिक अहवालात भारताचे शेजारी म्हणून दक्षिण आशियातील देश तसेच चीन, म्यानमार आणि मॉरिशिस, सेशल्स या हिंदी महासागरातील देशांचा उल्लेख केला आहे. मोदी यांनी मार्च २०१५ मध्ये श्रीलंका, मॉरिशस आणि सेशल्सचा दौरा केला. तसेच हिंदी महासागर क्षेत्रासाठी नवीन विभागाची निर्मिती

करण्यात आली. थोडक्यात 'ॲक्ट इस्ट आणि थिंक वेस्ट' ही अनुक्रमे पूर्व व पश्चिम आशियासाठी धोरणेही विस्तारीत शेजारी प्रथम या धोरणाची रूपे आहेत.

**पाकला एकटे पाडण्याचे धोरण**

ब्रिक्स परिषदेच्यावेळी चीनसोबत पाकची उपस्थिती टाळण्यासाठी बीम्सटेक (बे ऑफ बेंगॉल इनिसिएटीव्ह फॉर मल्टी सेक्टोरल टेक्नीकल ॲण्ड इकॉनॉमीक को–ऑपरेशन) देशांना भारताने आंमत्रित केले. या संघटनेत भारतासह श्रीलंका, बांग्लादेश, भूतान, नेपाळ, म्यानमार व थायलंड हे बिम्सटेकचे सदस्य आहेत.

थोडक्यात, भारताचे थायलंडचा समावेश शेजारी देशांच्या यादीत केला आहे. अशारितीने पूर्वेकडील शेजारी देशांचे नवे प्रारुप भारताने तयार केले आहे.

पश्चिमेकडे अफगाणिस्तान व इराण, किर्गिनीस्तान, ताजिकीस्तानशी सहकार्य वाढवले आहे. पाकिस्तानचे पश्चिम आशियातील पारंपारिक मित्र पाकच्या चीनच्या जवळकीमुळे काहीसे दुरावले आहेत. त्याचा फायदा भारताने घेतला पहिजे. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमीराती इ. देशांबरोबर संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे दक्षिण आशियाच्या पलिकडे जाऊन भारत 'शेजारी प्रथम' चे नवे विस्तारीत धोरण आखत आहे.

**सारांश**

शीतयुद्धोत्तर काळात जगात एकध्रुवी व्यवस्था निर्माण झाली. त्याबरोबरच अनेक नव्या प्रश्नांनी उग्ररूप धारण केले. याच काळात जागतिकीकरणाची प्रक्रिया वेग घेत होती. त्याचाही परिणाम भारतावर होत होता. या पार्श्वभूमीवर भारताला आपल्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार करणे भाग पडले. या कालखंडात पी.व्ही. नरसिंहराव यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधांना महत्त्व दिले. लुक ईस्ट धोरणाची मांडणी केली. तसेच अर्थव्यवस्थेला नवे वळण दिले. त्यानंतर इंद्रकुमार गुजराल यांनी भारताच्या परराष्ट्रनीतीचे सैद्धांतीकरण केले. भारताच्या शेजारील देशांबरोबर संबंध सुधारण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अटलबिहारी वाजपेयींच्या काळात परराष्ट्र धोरण अधिक वास्तववादी बनवण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर युपीए सरकारच्या काळात डॉ. मनमोहनसिंग यांनी अमेरिकेबरोबर नगारी अनुकरार करून चीन व पाकबरोबर संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु युपीए–२ च्या काळात मात्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची पीछेहाट झालेली दिसून येते. त्यानंतर २०१४ साली नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी आक्रमकपणे परराष्ट्र धोरण राबविले आहे. शेजारी प्रथम, ॲक्ट ईस्ट, आर्थिक व व्यापारी हितसंबंध तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची भूमिका पार पाडण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून परराष्ट्र धोरणाची आखणी व अंमलबजावणी सुरू केली आहे.

**संदर्भ :**

१. सी. राजा मोहन, अनु. सावकार इंद्रायणी, मोदीज् वर्ल्ड, रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, ऑगस्ट २०१६.

२. समाज प्रबोधन पत्रिका आणि सेंटर फॉर स्टडी इन कल्चर अॅन्ड सोसायटी, भारत आणि आंतरराष्ट्रीय भू–राजकारण, लोकवाङ्मय गृह, मुंबई, मार्च २०१०.

३. डॉ.देवळाणकर शैलेंद्र, भारत आणि जग, सकाळ प्रकाशन, पुणे, जून २०१५.

४. दैनिक लोकसत्ता.

५. दैनिक सकाळ.